सलाम "लोकशाहीला"

संगिता मालशे
जेंडर विशेषज्ञ

रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हपलमेंट (RSCD) या संस्थेला नुकतेच महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडून पहिल्या लोकशाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांत विविध स्तरातील महिलांनी निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी 25 वर्षांहून अधिक काळ RSCD संस्था काम करीत आहे.

देशातील जनतेचे कल्याण आणि देशात समानता प्रस्थापित करण्यासाठी मतदानाच्या माध्यमातून लोकांनी सरकार निवडून देणे आणि लोकांप्रती उत्तरदायी राहून पारदर्शी काम करणे, असा सोप्पा अर्थ आपण लोकशाही व्यवस्थेसाठी काढू शकतो.

संयुक्त राष्ट्र संघाच्या आकडेवारीनुसार, सध्या जगातील सर्वाधिक इंटरनेट वापरात भारताचा दुसरा क्रमांक लागतो; तर देशात 19 करोडहून जास्त घरांमध्ये टीव्ही चॅनेल्स असून, हजारो एफएम रेडीओ स्टेशन्सही कार्यरत आहेत, तसेच वृत्तपत्रे व तत्सम मासिके यांची संख्याही लाखांमध्ये आहे. याचा अर्थ भारतात माहितीचे स्त्रोत उदंड आहेत. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे, भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी केवळ ज्ञानाची आणि माहितीची गरज नसून, योग्य शिक्षणाची आवश्यकता आहे."

भारतात, जिथे अठरापगड जाती, धर्म, पंथ, रंग, वर्ग आणि समूह यासारख्या विविध उतरंडीत लोक राहात आहेत; तिथे लोकशाही प्रक्रिया प्रत्यक्ष स्वरूपात न पोहोचता ती झिरपत पोहोचण्याची शक्यता आपण पाहत आलो आहोत. त्यामुळे इथे लोकशिक्षण अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

लोकशिक्षणातून लोककेंद्री प्रशासन आणि निर्णय प्रक्रिया या ध्येयाने काम करणाऱ्या RSCD संस्थेने आज पर्यंत सामाजिक बदलासाठी काम करणाऱ्या विविध संस्था, जनसंघटना आणि नेटवर्क्स यांना बळ देण्याचे काम केले. वंचितांचे संघटन करत, सामुहिक आवाजातून सामाजिक बदल करण्यासाठी संस्था नेटाने प्रयत्न करत राहिली आहे.

भारतीय समाजात सर्वच क्षेत्रात महिलांचे स्थान नेहमीच दुय्यम आणि दुर्लक्षित राहिले आहे. आपल्याकडच्या जात, कुटुंब, अर्थ व्यवस्थांमध्ये महिलांचे स्थान तळचे समजले जाते आणि म्हणून अजूनही लोकशाही हक्कांसाठी व्यवहारात त्यांना स्वतंत्र नागरिक असण्यासाठीचे संघर्ष करावे लागतात. महिलांना आरक्षण देणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व यासाठीच अनन्यसाधारण आहे. त्यातून हजारो महिला पारंपारिक भूमिकातून बाहेर पडून स्थानिक स्वराज्य संस्थांतील निर्णय प्रक्रियेत सामिल झाल्या.

कुटुंब व्यवस्थेतील त्यांचे स्थान, कुटुंबातील कामाचे ओझे, पुरूषांच्या बरोबरीने काम करूनही कमी मोबदला मिळणे, समाजातील पुरूषप्रधानतेमुळे सार्वजनिक व कौटुंबिक स्तरावर मिळणारी दुय्यम वागणुक, त्यातून होणारा हिंसाचार या सर्वांतून महिलांच्या राजकिय सत्ता सहभागाची प्रक्रिया क्षीण होत राहते. या प्रश्नांच्या समूळ उच्चाटनासाठी महिला केंद्री धोरणे आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी तर आवश्यक आहेच पण त्याचबरोबर समाजाची पुरूषप्रधान मानसिकता बदलण्याची गरजही अधोरेखित होते.

सार्वजनिक स्तरावर राजकिय शिक्षण करण्यातून महिलांची सामाजिक आणि राजकिय पटलावरील उपस्थिती वाढली आहे. मतदानाचा हक्क बजावण्यापासून, राजकिय पक्षांचे मेळावे,

सदस्यता मोहीम, राजकिय बैठका, विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी होणारे विविध मोर्चे, अभियाने यात गेल्या पंचवीस वर्षात महिलांची संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

विविध जाती, धर्म, समूहांच्या महिलांनी राजकिय निर्णयप्रक्रियेत महिला मतदार आणि महिला कारभारणी म्हणून आपली नवी ओळख प्रस्थापित केली आहे. ग्रामीण स्तरावर सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसभा सदस्य, पंचायत समिती अध्यक्ष, सभापती, विविध समित्यांचे सदस्य, जिल्हा परिषद सभापती, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य यासारख्या विविध पदांवर महिलांनी येऊन कारभार चालविणे ही या पुरूषप्रधान समाजाला अशक्यप्राय वाटणारी गोष्ट साध्य करताना आरक्षणाच्या कायद्याचा मोठा आधार मिळाला.

या ऐतिहासिक मूक क्रांतीला नेटाने जिवंत ठेवण्याचे काम RSCD संस्था करत आहे. "सार्वभौम, समाजवादी, निधर्मी, लोकशाहीवादी आणि प्रजासत्ताक" अशी लोकशाहीची ओळख असलेल्या देशात ही मूल्ये रूजविण्यासाठी अविरत प्रयत्न करणे गरजेचे आहे. कधी व्यक्तीगत तर कधी सामुदायिक स्तरावरील निर्णयात जात, वर्ग, संस्कृती, परंपरा आपापला प्रभाव टाकत असतात. याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम महिलांवर होत असतो. यातून त्यांची विकासातून पीछेहाट होण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच महिलांच्या राजकिय अवकाशाला व्यापक करण्यासाठी महिलांचे राजकिय मनोबल उंचावणे; महिलांच्या राजकिय सत्ता सहभागाला कुटुंबातील सदस्य व शासन प्रशासनातील लोकांचे सहकार्य मिळवणे; महिला केंद्री कायदे, राजकिय व सामाजिक धोरणं याविषयी महिलांचे व्यापक शिक्षण करणे; सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय आणि आर्थिक निर्णय केंद्रात महिलांचा समान सहभाग, समान संधी आणि समान हक्क मिळविण्यासाठी पाठपुरावा करणे यासारख्या विविध आघाड्यांवर RSCD काम करीत आली आहे.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगासोबत आरएससीडीने गेल्या दहा वर्षात अनेक महिला केंद्री राजकिय शिक्षणाचे उपक्रम राबविले. राज्यस्तरावर ग्रामपंचायत महिला लोकप्रतिनिधींसाठी बनविलेली "क्रांतीज्योती प्रशिक्षण मॉडेल" म्हणजे महिलांसाठी असलेले सोप्पे शासकिय आणि प्रशासकिय गाईड आहे. लोकशाही पंधरवडयातील भागीदारी, राज्य आणि जिल्हा स्तरावर महिलांसाठी विविध मतदान व लोकशाही जागृती कार्यशाळा व परिषदा आयोजित केल्या आहेत. ग्रामपंचायतीत नव्याने निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींसाठी "राज्य इंडक्शन धोरण" म्हणजेच "पंचायतराज कारभाराची प्राथमिक ओळख" करून देण्यासाठीचे धोरण अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठी आरएससीडी राज्य निवडणूक आयोगासोबत IDEGG या राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मवरही पाठपुरावा करत आहे.

निवडणूकांविषयीची उदासीनता दूर करीत "भ्रमदान मुक्त मतदानाचा" मुद्दा संस्थेने कायम लावून धरला आहे. निवडणूकीदरम्यान वापरल्या जाणाऱ्या भ्रष्टाचार, मटण, दारू आणि नवस यासारख्या पद्धतींच्या विखारी विळख्यातून महिला व अन्य मतदारांनी बाहेर पडून भयमुक्त वातावरणात मतदान करून लोकशाहीचा हक्क बजावावा, यासाठी संस्थेने अनेक कल्पक उपक्रम राबविले आहेत.

भारताच्या बलाढ्य लोकशाही व्यवस्थेत तळाच्या पण सर्वात महत्त्वाच्या पंचायतीराज व्यवस्थेत महिलांसह वंचित समूहांना समान संधी आणि समान लोकशाही सहभाग मिळवून देण्यासाठी अविरत काम करणाऱ्या RSCD ला मिळालेला लोकशाही पुरस्कार हा या कामाला केलेला सलाम आहे!